**नि.क्र.१५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ याची साक्ष –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : गौरव महादेव दाभोळकर
वय सुमारे : २६ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी
राहणार : नेरुरपार, कुडाळ ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत –**

**०१.** माझेकडे दुचाकी असून त्याचा क्र.एम.एच.०७/ए.पी.–८६५८ असा आहे. सदरची दुचाकी माझे नावावर आहे. मी सदरची गाडी २०२३ पासून वापरतो. सदरची गाडी मी दिनांक २५/०५/२०२५ रोजी माझा मित्र जोसेफ फर्नांडीस यास वापरण्यासाठी दिली होती. सदरची गाडी पाच ते सहा दिवस त्याच्या ताब्यात होती. सदरची गाडी त्याच्या ताब्यात असताना दिनांक ०१/०६/२०२५ रोजी सदर गाडीचा अपघात झाला व त्याच्या मागे बसणारी व्यक्ती पडून मयत झाल्याचे मला समजले. दिनांक ०४/०६/२०२५ रोजी मला जोसेफच्या भावाचा फोन आला व त्याने मला सदर अपघाताबाबत सांगितले व सदरची गाडी पोलीसांनी जप्त केली असल्याचे सांगितले. सदरची गाडी नेण्यासाठी मला ओरोस पोलीस ठाण्यात दिनांक १३/०६/२०२५ रोजी बोलावले होते, परंतू माझेकडे आर.सी. बुक नसल्याने मी थोडा उशिरा गेलो. मी दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पोलीस ठाण्यात गेलो व गाडी ताब्यात घेतली. गाडी ताब्यात घेतली त्यावेळी गाडीचा फुट रेस्ट व हेडलाईटला प्राब्लेम झाला होता, बाकी काही झाले नव्हते. पोलीसांनी माझेकडे चौकशी केली होती. ज्या मित्राला गाडी दिली होती त्या जोसेफ फर्नाडीसला मी ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**MHSI030001082025** नियमीत फौजदारी खटला क्र.१६/२०२५

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.पी.एम.मुजावर यांचे मार्फत –</u>**

**०२.** सदरची गाडी माझे नावावर आहे म्हणून ती ताब्यात घेवून जाण्यासाठी पोलीसांनी माझे सोबत काही पत्रव्यवहार केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा भाऊ जॉली याने मला फोन केला म्हणून मी पोलीस ठाण्यात गेलो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात पोलीसांनी ताबा पावती लिहून घेऊन गाडीचा ताबा मला दिला. हे म्हणणे खरे आहे की, या व्यतिरिक्त पोलीसांनी माझा जाबजबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अपघात कसा व कोणामुळे घडला हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, म्हणून मी ताबा पावतीमध्ये माझी कोणाविरुध्द तक्रार नसल्याचे लिहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष अपघात पाहिला नसल्याने अपघातावेळी कोण गाडी चालवित होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझी गाडी आरोपीला वापरासाठी दिली होती असे जे सरतपासात सांगितले आहे ते खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपसातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास</u>** – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.03.24 18:47:46 +0530

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– २४/०३/२०२६.